क्र.२/नसवि/प्रशासक/०३/२०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २८ जून २०२४

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

प्रशासक सभा क्रमांक - ०३/२०२४-२०२५

स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०१/०७/२०२४ रोजी दुपारी ०१:०० वाजता महानगरपालिका मुख्यालय येथील कै.राजाभाऊ हरिभाऊ जगदाळे सभागृह, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

परिशिष्ठ

१. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.२४/०६/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सांगली प्रभाग समिती क्र.०२ मधील १०० फुटी राजर्षी छत्रपती शाहू महाराज मार्गावरील लघुदाब व उच्चदाब वाहिनी व पोल तसेच आर.एम.यु.युनिट शिफ्ट करणेकामी सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षासाठी नियुक्त केलेले एजन्सीधारक मे.एस.एस.असोसिएटस,सांगली यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.१,२२,०२,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (विद्युत विभाग) यांचे विषयपत्र.**

३. महानगरपालिका क्षेत्रातील भारत सुतगिरणी ते जकात नाका कुपवाड या पुर्व-पश्चिम रस्त्याच्या उत्तर बाजूस महावितरण कंपनीच्या मालकीची असलेली उच्चदाब व लघुदाब वाहिनी शिफ्ट करणेकामी सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या वर्षासाठी नियुक्त केलेले एजन्सीधारक मे.एस.एस.असोसिएटस,सांगली यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.५६,६७,९०५/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (विद्युत विभाग) यांचे विषयपत्र.**

४. मिरज पाणी पुरवठा विभागांतर्गत महापालिका क्षेत्रातील पाईप लाईन,वितरण नलिकावरील व्हॉल्व्ह, प्रशासकीय कनेक्शन्स, इतर स्वरुपाच्या गळत्यांची दुरुस्ती करणे, आवश्यक पाईप लाईन्स बदलणे, साहित्य पुरवठा करणे व खुदाई भराई जुडाई करणे इ.प्रलंबित व आवश्यक कामे करणे करीता वार्षिक दर करार एजन्सी मे.दया इन्फ्रास्ट्रक्चर,सांगली यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास व यासाठी वाढीव र.रु.९०,००,०००/- इतकी मंजुर वार्षिक दर कराराची मर्यादा वाढविणेस व याकामी मंजुर लेखाशिर्षामध्ये वाढीव रक्कमेची तरतुद करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्र.**

मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १२ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.२४/०६/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०६ ते ठराव क्र.११ हे वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती लिपिक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १३ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (विद्युत विभाग) यांचे दि.०१/०७/२०२४ रोजीचे सांगली प्रभाग समिती क्र.२ मधील १०० फुटी राजर्षी छत्रपती शाहू महाराज मार्गावरील लघुदाब व उच्चदाब पोल तसेच आर एम यु युनिट शिफ्ट करणे कामगिरी मंजुर वार्षिक एजन्सी कडून करुन घेणेसाठी आलेल्या विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार ,

उपरोक्त १०० फुटी राजर्षी छत्रपती शाहु महाराज मार्गावरील लघूदाब व उच्चदाब वाहिनी व पोल तसेच आर.एम.यु. युनिट अडथळा करीत आहे, त्यामुळे रस्ता पूर्ण क्षमतेने वापरात येत नाही, तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांना वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळा होत असून भविष्यात संभाव्य अपघात होऊन जीवीतहानी अथवा वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता सदर ठिकाणी असणारे विद्युत पोल,लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी रस्त्याच्या कडेला शिफ्ट करणे आवश्यक असे आहे.

वरीलप्रमाणे सदर रस्त्यावरील विद्युत पोल,लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी तसेच आर.एम.यु. युनिट स्थलांतरीत करणेबाबत येणा-या खर्चाच्या १.३ टक्के डी.डी.एफ.योजनेअंतर्गत सुपरव्हिजन चार्जेसचे कोटेशन महावितरण कंपनीकडून प्राप्त झालेले आहे. सदरची कामगिरी महावितरण कंपनी सांगली शहर कार्यालय यांचे सुपरव्हिजन खाली सुपरव्हिजन चार्जेस भरून मनपा अंतर्गत मंजूर वार्षिक एजन्सी मे. एस.एस. असोसिएट्स, सांगली यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० टक्के कमी दराने म्हणजे रक्कम रू१,२२,०२,८००/- (एक कोटी बावीस लाख दाने हजार आठशे रुपये मात्र) मात्रच्या रक्कमेची कामगिरी करून घ्यावी लागणार आहे.

सदर विद्युत पोल,लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी तसेच आर.एम.यु. युनिट शिफ्ट करणे कामगिरीबाबतचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून या कामगिरीस रक्कम रू. १,२२,१५,०१५/- (एक कोटी बावीस लाख पंधरा हजार पंधरा रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकास रितसर तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त कामगिरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये याकामी सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षासाठी सांगली मिरज कुपवाड शहरांतर्गत वार्षिक दर करारासाठी एच.टी. आणि एल.टी. लाईन्स, ट्रान्सफॉर्मर केंद्र आणि इतर संबंधीत कामाचे स्थलांतरासाठी मा.स्थायी समिती ठराव क्र.२५९ दि.१५/०३/२०२४ अन्वये मे.एस.एस.असोसिएटस, सांगली यांचेकडून निश्चित करणेत आलेल्या दरानुसार सदरच्या मंजुर वार्षिक एजन्सी कडून सदर कामगिरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० टक्के कमी दराने म्हणजे र.रु.१,२२,०२,८००/- (एक कोटी बावीस लाख दाने हजार आठशे रुपये मात्र) मात्रच्या खर्चास आणि सदरचा खर्च सन २०२४-२५ महानगरपालिका अर्थसंकल्पीय ई - ०२२७) रहदारीस अडथळा करणारे खांब हलविणेचा खर्च या लेखाशिर्षामधून होणेसाठी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

विद्युत अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- १४ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (विद्युत विभाग) यांचे दि.०१/०७/२०२४ रोजीचे महानगरपालिका क्षेत्रातील भारत सुत गिरणी ते जकात नाका कुपवाड या पूर्व पश्चिम रस्त्याच्या उत्तर बाजूस महावितरण कंपनीच्या मालकीची असलेली उच्चदाब व लघूदाब वाहिनी शिफ्ट करणे कामगिरीच्या विषयपत्राचे अवलोकन करणेत आले त्यानुसार,

उपरोक्त सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील भारत सुत गिरणी ते जकात नाका कुपवाड या मार्गावरील पूर्व पश्चिम रस्त्याच्या उत्तर बाजूस महावितरण कंपनीच्या मालकीची असलेली उच्चदाब व लघूदाब वाहिनी अडथळा करीत आहे. त्यामुळे रस्ता पुर्ण क्षमतेने वापरात येत नाही, तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांना वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळा होत असून भविष्यात संभाव्य अपघात होऊन जीवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता सदर ठिकाणी असणारे विद्युत पोल, लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी रस्त्याच्या कडेला शिफ्ट करणे आवश्यक असे आहे.

वरीलप्रमाणे सदर रस्त्यावरील विद्युत पोल,लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी स्थलांतरीत करणेबाबत येणा-या खर्चाच्या १.३ टक्के डी.डी.एफ.योजनेअंतर्गत सुपरव्हिजन चार्जेसचे कोटेशन महावितरण कंपनीकडून प्राप्त झालेले आहे. सदरची कामगिरी महावितरण कंपनी सांगली शहर कार्यालय यांचे सुपरव्हिजन खाली सुपरव्हिजन चार्जेस भरून मनपा अंतर्गत मंजूर वार्षिक एजन्सी मे. एस.एस. असोसिएट्स, सांगली यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० टक्के कमी दराने म्हणजे र.रू.५६,६७,९०५/-(छप्पन्न लाख सदुसष्ठ हजार नऊशे पाच मात्र) मात्रच्या रक्कमेस सदरची कामगिरी करून घ्यावी लागणार आहे.

सदर विद्युत पोल,लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिनी शिफ्ट करणे कामगिरीबाबतचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असून सदर कामगिरीस रक्कम रू.५६,६७,९०५/-(छप्पन्न लाख सदुसष्ठ हजार नऊशे पाच मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकास रितसर तांत्रिक मान्यता देणेत आलेली आहे.

उपरोक्त कामगिरी सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षासाठी सांगली मिरज कुपवाड शहराअंतर्गत वार्षिक दर करारासाठी एच.टी. आणि एल.टी. लाईन्स, ट्रान्सफॉर्मर केंद्र आणि इतर संबंधीत कामाचे स्थलांतरासाठी नियुक्त वार्षिक एजन्सी मे.एस.एस.असोसिएटस, सांगली यांना मा. स्थायी समिती ठराव क्र.२५९/२०२३-२४ दि.१५/०३/२०२४ अन्वये मंजूरी मिळाली असून सदर कामगिरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१० टक्के कमी दराने रू.५६,६७,९०५/-(छप्पन्न लाख सदुसष्ठ हजार नऊशे पाच मात्र) मात्रच्या खर्चास आणि सदर खर्च सन २०२४-२५ महानगरपालिका अर्थसंकल्पीय ई - ०२२७) रहदारीस अडथळा करणारे खांब हलविणेचा खर्च या लेखाशिर्षामधून होणेसाठी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

विद्युत अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०३/२०२४-२५

स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-१५ **दिनांक :- ०१/०७/२०२४**

विषय क्रमांक :- ०४

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांचा वापर करुन,

सोबतचे उपायुक्त (पाणी पुरवठा विभाग) यांचे दि.२८/०६/२०२४ चे विषयपत्राचे अवलोकन करणेत आले.

मिरज पाणी पुरवठा विभागांतर्गत महापालिका क्षेत्रातील पाईप लाईन,वितरण नलिकावरील व्हॉल्व्ह, प्रशासकीय कनेक्शन्स, इतर स्वरुपाच्या गळत्यांची दुरुस्ती करणे, आवश्यक पाईप लाईन्स बदलणे, साहित्य पुरवठा करणे व खुदाई भराई जुडाई करणे इ.प्रलंबित व आवश्यक कामे करणे करीता वार्षिक दर करार एजन्सी मे.दया इन्फ्रास्ट्रक्चर,सांगली यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास व यासाठी वाढीव र.रु.९०,००,०००/- इतकी मंजुर वार्षिक दर कराराची मर्यादा वाढविणेस व याकामी मंजुर लेखाशिर्षामध्ये वाढीव रक्कमेची तरतुद करणेस प्रशासक स्थायी समिती ठराव क्र.०३ दि.१०/०६/२०२४ अन्वये वाढीव र.रु.९०,००,०००/- ची तरतुद करणेसाठी रितसर नमुना नं.१० मध्ये लेखाशिर्ष नमुद करुन, पुनर्विनियोजन पत्रकासहीत प्रस्ताव फेरसादर करणेस आदेशित करणेत आले होते.

त्यानुसार उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मिरज मेंडले पेट्रोल पंप वखारभाग ड्रेनेज पंपहाऊस ते माळी स्मशान भूमी या दरम्याने ड्रेनजेचे गॅप मधील अती महत्वाचे काम थांबल्यामुळे झोपडपट्टीचे अतिक्रमण काढून, सदर ठिकाणी रस्त्याच्या साईटला नविन पाईप लाईन टाकणे आवश्यक होते. तसेच मिरज पाणी पुरवठा विभागाकडील देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी नियुक्त वार्षिक एजन्सी कडून त्यांची मुदत अद्याप बाकी असल्याने, मे.दया इन्फ्रास्ट्रक्चर,सांगली यांचेकडून कामगिरी करुन घेणे उचित होणार आहे. यासाठी उपरोक्त प्रमाणे पाईप शिफ्टींग व गळत्यांची दुरुस्त्या व क्रॉस कनेक्शन करणे, साहित्य पुरवठा करणे इत्यादी दुरुस्ती अंतर्गत कामे करणे आवश्यक असल्याने उपरोक्त कामी येणाऱ्या खर्चासाठी प्रस्तावित लेखाशिर्ष पाणी पुरवठा महसुली खर्च - E -६४४ पाईप लाईन देखभाल दुरुस्ती यामध्ये वाढीव तरतुद करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरची कामगिरी नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यावश्यक व तातडीने करणे गरजेचे असल्याने, एक वेळची बाब म्हणून विभागाने प्रस्तावित केलेल्या नमुना नं.१० नुसार लेखाशिर्ष ५ - इतर योजना E - १११२ मा.आयुक्त निधी र.रु.१०,००,००,०००/- या लेखाशिर्षातून पाणी पुरवठा महसुली खर्च - E-६४४ पाईप लाईन देखभाल दुरुस्ती या लेखाशिर्षामध्ये र.रु.९०,००,०००/- मात्र पुनर्विनियोजन करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

पाणीपुरवठा अधिक्षक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका